स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504 नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
फॅक्स क्रं. - 02462-235103 E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं./ प्रेस नोट/249/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 19/07/2024

# 1)खुन :–

**1)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 17.07.2024 रोजी चे अंदाजे सकाळी 06.00 वा. चे सुमारास, **नविन मुजामपेठ जि. प. शाळेजवळ नांदेड येथे**, यातील **मयत नामे शेख शहेबाज शेख शकील, वय 23 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. मदिना मस्जिद दुध डेअर रहीमपुर ता. जि. नांदेड** हा नविन मुजामपेठ येथील नसीमा बेगम हिची सुन मसरत शेख बहादुर हिला भेटण्यासाठी गेला असता जुन्या भांडणाचा राग मनात धरून यातील नमुद आठ आरोपीतांनी संगणमत करून तलवार व खंजरने वार करून यातील फिर्यादीचे भावाचा खुन केला. वगैरे **फिर्यादी शेख आरबाज शेख शकील, वय 21 वर्षे, व्यवसाय फर्निचर रा. मदीना मस्जीद दुध डेअरी रहीमपुर ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 620/2024 कलम 103 (3), 190(2), 191(3), 190 भारतीय न्याय संहिता–2023 सह कलम 4/25, 4/27 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री कांबळे, मो.क्रं. 9823031227** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 17.07.2024 रोजी चे 19.15 वा. चे सुमारास, **गौतमीनगर बळीरामपुर ता. जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे अमोल रामेश्वर लांडगे, वय 23 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गौतमीनगर बळीरामपुर ता. जि. नांदेड** यास यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून जुन्या भांडणाचे कारणावरून खंजरने छातीवर, पोटावर व पाठीवर वार करून व लाथा बुक्याने मारहाण करून गंभीर जखमी करून खुन केला. वगैरे **फिर्यादी रामेश्वर लिंबाजी लांडगे, वय 48 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गौतमीनगर बळीरामपुर ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 621/2024 कलम 103 (1), 115(2), 3(5) भारतीय न्याय संहिता–2023 सह कलम 4/25, 4/27 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मटवाड, मो.क्रं. 9922778115** हे करीत आहेत.

# 2)खुनाचा प्रयत्न :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 17.07.2024 रोजी चे 17.30 वा. चे सुमारास, **शाहुनगर वाघाळा रस्त्यावर ता. जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीने आरोपीस रस्त्यावर उघडयावर का लघवी करतोस, मुलं पाहातात चांगले वाटत नाही असे म्हणाले असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगनमत करून खंजरने फिर्यादीचे मांडीवर चार ते पाच वार करून, डावे हाताचे मनगटावर वार करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी अजय भगवान जोगदंड, वय 22 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. राहुलनगर एन डी 41 के–2 सिडको नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 623/2024 कलम 109, 352 3(5) भारतीय न्याय संहिता–2023 सह कलम 4/25, 4/27 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री चव्हाण, मो.क्रं. 9881429928** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**मरखेल** :– दिनांक 17.07.2024 रोजी चे 22.00 ते दिनांक 18.07.2024 रोजी चे 03.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी मौ. आमदापुर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात आरोपीतांनी फिर्यादीचे घरात प्रवेश करून फिर्यादीने तिचे अपंग मुलीसाठी घरातील पेटीत ठेवलेले सोन्या–चांदीचे दागने किंमती 48,500/–रू चे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी चंद्राबाई भ्र. व्यंकटराव मंदिरलवार, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. आदमपुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 184/2024 कलम 305, 331,(4) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 शेख, मो. नं. 7776067477** हे करीत आहेत.

## 4)जनावर चोरी :–

**1)उमरी** :– दिनांक 17.07.2024 रोजी चे 21.00 ते दि. 18.07.2024 चे 06.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोरील गोठयातुन चौक गल्ली उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घरासमोरील गोठयातुन तीन म्हशी किंमती 1,23,000/–रूपयाच्या कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्या. वगैरे **फिर्यादी सुभाषराव साहेबराव शिंगरवाड, वय 54 वर्षे, व्यवसाय शेती रा. चौक गल्ली उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 261/2024 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2354 गेडाम, मो.क्रं. 9421768528** हे करीत आहेत.

**2)विमानतळ** :– दिनांक 16.07.2024 रोजी चे सायंकाळी 18.00 ते दि. 17.07.2024 चे सकाळी 06.00 वा. चे दरम्यान, **मौ. ब्राम्हणवाडा ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील आखाडयावरून धावणीला बांधलेले दोन बैल किंमती 68,000/–रू चे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी बालाजी धोंडीबा सोनटक्के, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. ब्राम्हणवाडा ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरनं 257/2024 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/344 राणे, मो.क्रं. 9970391886** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**1)मुखेड** :– दिनांक 08.02.05.2024 पर्यंत वेळ नक्की नाही, **आंबेडकर नगर आबादी नांदेड येथे,** यातील नमुद नऊ आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस मोटार सायकल घेण्यासाठी तुझे माहेरहुन दोन लाख रूपये घेऊन ये म्हणुन फिर्यादीस उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून, शारीरीक व माणसीक छळ केला. जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 33 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुखेड** गुरनं 256/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/2223 कदम, मो.क्रं. 8390695468** हे करीत आहेत.

**2)मुक्रामाबाद** :– दिनांक 13.06.2024 रोजी चे सुमारास, **मौ. राजुरा ता. मुखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे माहेरहुन नवऱ्यास कामधंदा करण्यासाठी दोन लाख रूपये घेऊन ये म्हणुन उपाशी पोटी ठेऊन शारीरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 34 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मुक्रामाबाद** गुरनं 151/2024 कलम 498(अ), 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/2319 सिध्देश्वर, मो.क्रं. 7620481485** हे करीत आहेत.

**3)अर्धापुर** :– दिनांक 16.11.2022 ते दि.15.05.2024 रोजी चे 11.00 दरम्यान, **मौ. पार्डी ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस दुसरी कार घेण्यासाठी म्हणुन तुझे माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन शारीरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 40 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 386/2024 कलम 498(अ), 494, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/2241 तोरणे, मो.क्रं. 9637973557** हे करीत आहेत.

**4)शिवाजीनगर** :– दिनांक 17.03.2024 रोजी चे 14.00 ते दिनांक 30.06.2024 चे 22.00 वा. चे दरम्यान, **नालंदानगर ता. पुर्णा ह. मु. श्रावस्तीनगर नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुम्ही लग्नात सामान कमी दिले, तुला घरचे काम नीट जमत नाही आम्ही कर्ज बाजारी झालोत तेव्हा तुझे वडीलांकडुन कापड दुकान टाकण्यासाठी पाच लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारीरीक व माणसीक छळ केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 35 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 263/2024 कलम 498(अ), 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन, **तपास पोहेकॉ/2753 शेख ल्याकत, मो.क्रं. 9923799345** हे करीत आहेत.

## 6)प्राण्यांस क्रुरतेने वागणुक :–

**किनवट :–** दिनांक 18.07.2024 रोजी चे 14.25 वा. चे सुमारास, **घोटी ते किनवट जाणारे रोडवर कलावती गार्डनचे समोर ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररीत्या गोवंश जातीचे जनावरे किंमती 52,000/–रू चे एक पांढऱ्या रंगाचा टाटा कंपणीचा 407 वाहन क्रमांक एमएच–48/टी–6001 किंमती 5,52,000/–रू चे मुद्येमालासह वाहतुक करीत असताना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3209 सदाशिव माणिकराव अनंतवार, ने. पोस्टे किनवट** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 207/2024 कलम 11(1),(डी),(1)(ड),11(च) प्राण्यांस निर्दयतेने वागण्यास प्रतिबंध कायदा सह कलम 5, 5(अ),5(बी), महाराष्ट्र प्राणी संरक्षण व प्राण्यांना क्रुरतेने वागणुक अधिनियम 1960 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री झाडे,** मो.क्रं. 8668842897 हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :–

**1)नायगांव** :– दिनांक 08.07.2024 रोजी चे सायंकाळी 18.00 चे सुमारास, **फिर्यादीचे पेंट दुकान नायगांव ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद मोबाईल धार क्रमांक 7498514238 यांनी फोन करून पेंट संबधाने व पेंटाचे भाव संबधाने विचारपुस करून फिर्यादीचा विश्वास संपादन करून दुकानात रॉयल शाईन पेंट 20 लिटरचे दोन डबे व अलटीमा 20 लिटरचे तीन डबे असे एकुण 52,500/–रू चा खोटया सहीचा चेक देवुन फिर्यादीची आर्थीक फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी सुरेश बाबुराव चव्हाण, वय 31 वर्षे, व्यवसाय पेंट दुकान रा. जुने नायगाव ता. नायगांव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगांव** गुरनं. 188/2024 कलम 316(2),318(4) भारतीय न्याय संहीता–2023 कायद प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बनसोड, मो.नं. 9552509690** हे करीत आहेत.

**2)शिवाजीनगर** :– दिनांक 26.09.2023 रोजी चे 12.00 ते दिनांक 19.03.2024 चे 22.00 वा. चे दरम्यान, **सुजकी शोरूम व्ही आय पी रोड नवीन मोंढा नांदेड येथे,** यातील फिर्यादीस यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बजाज फायनांन्स कंपणी शाखा क्रमांक 166/571 सुजकी शोरूम व्ही आय पी रोड नवीन मोंढा नांदेड येथील शेत सर्वे नं 162/अ पैकी प्लॉट क्रमांक 122 ज्याचा म.न.पा मालमत्ता पिन नं 40509070803 चे मालमत्तेच दिनांक 26.09.2023 चे रोजी बजाज फायनान्सं कंपणी शाखा नांदेड यांना मॉडगेज करून दिले. सदर मॉडगेजचा फाईल क्रमांक एनडीए 2–1708–2023 असा आहे. सदर कपंणीकडुन रूपये 31,44,257/–रू कर्ज घेतले आहे. सदर कर्जाची परतफेड करणेसाठी त्यांना 39,746/–रू चा हफ्ता ठरविण्यात आला होता. परंतु सदर कर्जाची परतफेड न करता आरोपी क्र 1 यांनी सदर प्लॉट हा बजाज फायनांन्स कपंणी यांना माहिती न देता दिशाभुल करून आरोपी क्रमांक 02 यांना विक्री करून फायनांन्स कंपणीची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी आशिष एकनाथ जाधव, वय 27 वर्षे, व्यवसाय बजाज फायनांस कंपणी शाखा नांदेड येथे मॅनेजर रा. गुरूद्वारा गेट नं 03 भाटीया जनरल स्टोअर्स जवळ नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं. 262/2024 कलम 420, 34 भादवि कायद प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.नं. 9403546846** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड